# राशिभविष्य - ऑगस्ट, २०१५.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष** - शारीरिक, मानसिक व बौद्धिक असे सर्व प्रकारचे आरोग्य आणि कौटुंबिक सुखसमाधान या दृष्टीने या महिन्याचा काळ या राशीच्यामंडळीना अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. काही मंडळीना भूमिलाभ तर काहीना प्रतिष्ठा , काहीना मानाचे स्थान तर काहीना धनलाभ होण्याची शक्यता दिसते. पण रवी-मंगळ-बुध हे तीनही ग्रह प्रतिकुल असल्याने अनारोग्य, कार्य दिरंगाई, कौटुंबिक त्रास , वाद, भांडणे, खर्च वाढ, असमाधानकारक घटना, राहत्या जागेची समस्या किंवा स्थावर बाबतचा वाद अशापैकी कारणांनी त्रस्त व्हाल. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळीना घरातील प्रिय जनांपासून फारकत झाल्यामुळे अस्वस्थता येईल. काहीना संतती समस्या त्रस्त करील. काहीना नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. पण गुरु ग्रहामुळे काही शुभ घटनाही घडतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात उच्च प्रगती करणे शक्य होईल. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध निर्माण होतील. ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होतील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अपेक्षित कार्यसिध्दी होईल. पण अष्टम स्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनीमुळे आजार, अपघात होणे संभवते. जपा. कुमार्गी मित्रांपासून त्रास होणे संभवते. जपा. चंचल, अस्थिर स्वभावावर नियंत्रण ठेवा. कुलास्वामीची वा शिव शंकराची उपासना करा.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. पण व्यापार-व्यवसाय असणारांना मात्र सर्वच बाबतीत अनिश्चित परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. द्रव पदार्थाचे व्यापारी आणि मानसोपचार तज्न्य तसेच दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मित्रांशी वितुष्ट येण्याची शक्यता दिसते. जपा. या महिन्याच्या काळात विविध कारणांनी या राशीच्या मंडळीना अपेक्षित असे संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण

दगदग करू नये. आजारपण, अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे शक्य आहे. जपा. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने परिस्थिती आटोक्यात राहील. स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार करावयाचे असणारांना काळ अनुकुल, लाभदायक व सुखकारक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनि ग्रहामुळे स्वत:चे किंवा जीवनसाथीचे अनारोग्याची समस्या त्रस्त करील. त्यामुळे व दोघांतील मतभेदामुळे वैवाहिक सुख मिळणे अशक्य होईल. जपा. काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने आर्थिक चिंता करावी लागणार नाही. उलट काहीना अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होणे संभवते. तसेच काही मंडळीना बढती, काहीना मानाचे स्थान असेही काही मिळू शकेल. काही मंडळीना प्रवासाचे योग येतील. एकंदरीत संमिश्र प्रकारचे अनुभव देणारा असा या महिन्याचा काळ असेल. कुलदैवताची उपासना अनुकुलहोईल व त्यामुळे मन:शांती मिळेल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध आर्थिक समस्या, अनारोग्य यांमुळे मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. विशेष करून डोळ्याच्या दुखण्याचा त्रास होणे संभवते. जपा. पण शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे अपेक्षित कौटुंबिक सुखात बाधा येणार नाही. मात्र महिन्याच्या उत्तरार्धात वाद, भांडणे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात ब गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. तक्रारखोर स्वभाव, कोणाशी पटवून न घेण्याची वृत्ती यांमुळेच गृहसौख्यात बाधा येऊ शकेल. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी शत्रूराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे या राशीच्या मंडळीबाबत अकारण गैरसमजाने वाईट मत होण्याची शक्यता दिसते. जपा. मन:शांतीसाठी या राशीच्या मंडळीनी आध्यात्मिक उपासनेत मन रमवावे, हे उत्तम. आध्यात्मिक उपासनेस काळ अनुकुल होईल. या राशीच्या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या युवकांनी सध्या आहे ती नोकरीच मनापासून करावी. नवीन काही करण्याचा विचारही करू नये. त्यासाठी काळ अनुकुल नाही. अविचाराने काही कराल तर नंतर पश्चात्ताप करावा लागेल. जपा. पण उच्च, चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तसेच शास्त्रीयसंशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल होईल. काहीना बढती, तर काहीना उच्च पद वा मानाचे स्थान मिळण्याची शक्यता दिसते. मन

व बुद्धीवर  ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण कराल तर सर्व  सुखाचेच होईल.

**(४) कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात रवी-मंगळ-शनि हे तीनही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे स्वभाव संतापी, हेकट होणे संभवते. तसे घडले तर अकारण दगदग कराल व मनासारखेघडले नाही तर शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार होणे संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना घरीदारी मनस्तापच सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी तर या प्रतिकुल काळात मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच काळ व्यतीत करावा, तरच फारसे अनारोग्य होणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. शिवाय फसवणूक, वित्तहानी होणेही शक्य आहे. जपा. काही मंडळीना नेत्रविकाराचा तर काहीना घसा, मानदुखीचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. कौटुंबिक जीवनात मतभेद, भांडणे यांमुळे गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी शत्रूराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे संततिविषयक समस्या त्रस्त करतील जपा. त्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होणे शक्य दिसते. राहूमुळे बंधुसुखात बाधा येणे संभवते, पाण्याशी संबंधित नोकरी-व्यवसाय असणारांनी विशेष जपावे. जलभय, विषभय आहे. जपा. अशा प्रतिकुल काळात गुरु-शुक्र या शुभ ग्रहांचीअनुकुलता असल्यामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. मन:शक्ती प्राप्त होण्यासाठीश्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा " चे पठण करा.

**(५) सिंह** - या राशीच्या मंडळीनी या संपूर्ण महिन्याच्या काळात मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनूनच आचरण करावे असे सांगावेसे वाटते. मन:शांतीसाठी शिवोपासना अनुकुल होईल. अस्वस्थ मनस्थिती राहिली तर गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. मानी व अहंकारी स्वभावामुळे नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील व त्यामुळे असह्य मनस्ताप होईल. रवि-मंगळ-राहू पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे मनस्ताप देणाऱ्या घटनाच घडण्याची शक्यता आहे. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यातराहील. या राशीच्या चतुर्थ स्थानी शत्रूराशीत असलेल्या शनि ग्रहामुळे राहत्या जागेची समस्या, स्थावरसंबंधी वाद मातेशी न पटणे किंवा मातेस असलेला कसला तरी त्रास अशापैकी कारणांनी

गृहसौख्यात बाधा येणे शक्य दिसते. नोकरदार मंडळीनी स्वत:च्या मानी अधिकारशाही स्वभावावर ताबा ठेवून सामोपचाराचे आचरण केल्यास खूपच सुखाचे होईल. रक्तविकार, मुखदंत विकार बळावण्याची शक्यता जाणवते. जपा. काहींना त्वचाविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. सतत सावधानतेने आचरण करा. विचाराच्या तंद्रीत वाहन चालवू नका . अपघात भय आहे. जपा. कोणत्याही कलाक्षेत्रातील मंडळीना काळ लाभदायक होईल. या राशीचे विद्यार्थी मानी, तापट स्वभावावर ताबा ठेवून व नम्रतेचे आचरण करून प्रतिकुल काळावर मात करू शकतील व शैक्षणिक प्रगती करू शकतील. या राशीच्या लेखकांचे लिखाण पुस्तकरूपाने प्रसिद्ध होईल. विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुख लाभणे अशक्य होईल. कुलदैवताची व भगवान शंकराची उपासना अनुकुल होईल.

(६) **कन्या** - या महिन्याच्या काळात या राशीच्या काही मंडळीची मनस्थिति थोडी विचित्रहोण्याची शक्यता दिसते. उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. तसेच काल्पनिक चिंताही त्रस्त करतीलसे दिसते. त्यांच्या अशा अवस्थेचा गैरफायदा घेऊन त्यांची फसवणूक होणेही संभवते. जपा. या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. काहीना मौल्यवान वस्तू प्राप्त होणेही शक्य आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीनी महिन्याच्या पूर्वार्धातच जे काय साधावयाचे ते साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात मनस्ताप देणाऱ्या घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. समाजकार्याची आवड असणारांना तसेच अध्यात्मात रस असणारांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. या राशीच्या युवकांना अपेक्षित अशी उत्तम नोकरी वा आवडते कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता आहे. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील, असे वाटते. काहीना वातविकाराचा तर काहीना कर्णपीडेचा त्रास सहन करावालागण्याची शक्यता दिसते. तसेच काहीना कुसंगतीचा परिणाम भोगावा लागण्याची शक्यता आहे. जपा. साहित्य, कला व क्रीडा क्षेत्रातील मंडळीना काळ प्रगतिकारक होईल, पण स्वतंत्र व्यावसायिकांना प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. दाम्पत्यजीवनात जीवनसाथीच्या विक्षिप्त आचरणामुळे, किंवा दोघांतील मतभेदामुळे, वादामुळे अपेक्षित सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना, यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. पण महिन्याच्या अखेरच्यासप्ताहात कलाक्षेत्रातील मंडळीना थोडा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. पण पहिले तीन सप्ताह या राशीच्या सर्वांनाच मन प्रसन्न करणारे जातील. पण काही मंडळीना आरोग्यविषयक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. डोके दुखणे किंवा मेंदूचे विकार त्रस्त करण्याची शक्यताआहे. जपा. गुरुकृपेने या राशीच्या विद्यार्थ्यांना अनुकुल व उत्साहवर्धक होईल व ते सहज रीत्या अपेक्षित शैक्षणिक प्रगती करू शकतील. तसेच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही मंडळीचे मित्रांशी वाद, भांडणे होऊन त्यांच्याशी शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. काहीना अपयश, मानहानीला सामोरे जावे लागेल. काहीना कानाचे दुखणे त्रस्त करील. या राशीच्या धनस्थानी शत्रुराशीतील शनि असल्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता जाणवते. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतीलसे दिसते. कोर्ट कचेरी प्रकरणे असतील तर त्यांचा मनस्तापच सहन करावा लागेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्री हनुमान उपासना अनुकुल होईल व बरे वाटेल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या काळात स्वत:च्या शारीरिक-मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष पुरविणे अगत्याचे होईल. काळ शनि ग्रहाच्या साडेसातीचा असून सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळेच अनारोग्य होणे संभवते. यासाठी मनाचा निर्धार करा, सहनशील व्हा, आणि प्रतिकुलपरिस्थितीशी सामना करा. जिद्दीला पेटून अविचाराने कोणताही निर्णय घेऊ नका. जीवनसाथीशी वाद टाळा. नपेक्षा जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या मनास्तापात भरच घालील. जपा. गैरसमज होणार नाहीत याची काळजी घेतलीत तरच गृहसौख्य लाभू शकेल. नोकरी-व्यवसाय काहीही असो, महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. पण महिन्याच्याउत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. इच्छा आकांक्षा काही प्रमाणात पूर्ण होतील. नव्या ओळखी होतील. त्याचा खूप उपयोग होईल. या राशीच्याविद्यार्थ्यांच्या शैक्षणिकप्रगतीत अडथळे निर्माण होतील. गूढ संशोधन , साहित्यनिर्मिती , कालाविषकारास काल अनुकूल होईल. काहीना नवे

कार्यक्षेत्र मिळू शकेल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे काही मंडळीना भूमिलाभ तर काहीना धनलाभ होणे संभवते. काहीना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात मनोनुकुल घटना घडतील. काही भाग्यवंत मंडळीना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल. नवे मित्र मिळतील. श्रद्धेने श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. शनि-रवि-मंगळ हे महत्त्वाचे तीनही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल आहेत. गुरु-शुक्र हे शुभ ग्रह केवळ महिन्याच्या उत्तरार्धातच काही प्रमाणात अनुकुल होतील. त्यामुळे या राशीच्या मंडळीनी सतत सावधानतेने सर्व व्यवहार करावेत व मन व विचारशक्ती सतत स्थिर, शांत राखण्याचा प्रयत्न करावा, असे सांगावेसे वाटते. अस्वस्थ मनस्थिती, जबाबदारी पार पाडण्याची चिंता यामुळे कोणी काही उपदेश केला, समजावण्याचा प्रयत्न केला तरी काही उपयोग होणार नाही. कोणाशी पटणार नाही, सुखसमाधान लाभणार नाही, वास्तुसुख लाभणार नाही, त्यासाठी मनाचा निश्चयकरून व मन शांत राखून सहनशील बनून आचरण करता आले पाहिजे. तरच फारसा मनस्ताप होणार नाही. जपा. केवळ राहूमुळे नोकरदार मंडळीना नोकरीतफारसा त्रास होणार नाही, असे वाटते. उलट काही प्रमाणात लाभच होतील असे दिसते. रस्त्यावरचे खाणे शक्यतो टाळाच. विषभय संभवते. उषणता विकारांचे आजार होण्याची शक्यता जाणवते. शिवाय अपघातभय आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात वडील व्यक्तींशी मतभेद, वाद होण्याची शक्यता दिसते. जपा. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे थोड्यामनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. आपली राशी गुरु ग्रहाची राशी असल्याने व गुरु ग्रह भाग्यस्थानी असल्याने अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळविणे सहज शक्य होईल. या राशीच्या काही मंडळीना जलप्रवासाची तर काहीना परदेशवारीची संधी मिळेल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमाने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या संपूर्ण काळात शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखण्याकडे सतत लक्ष द्यावे, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. कारण काळ सर्वतोपरी प्रतिकुल आहे. केवळ उच्च चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांनाच काही प्रमाणात काळ अनुकुल व लाभदायक होईल. इतरांनी घरीदारी सतत

सावधानतेने आचरण करावे. मन व विचारशक्ती शांत व स्थिर राखण्याचा प्रयत्न करूनच प्रतिकुल काळ व्यतीत करावा. तरच फारसे अनारोग्य होणार नाही. विविध आघाड्यावरील परिस्थितीशी मुकाबला करावा लागणार असल्याने सर्व प्रकारची आरोग्यसंपन्नता राखणे आवश्यक आहे. रवी-मंगळ-शुक्र पूर्णपणे प्रतिकुल असल्याने आर्थिक चिंता, कौटुंबिक सुख, वैवाहिक जीवनातील सुख, गृहसौख्य यांत बाधा निर्माण होणे संभवते. जपा. ज्या ंचाभागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. कोर्ट प्रकर णे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. आजारपण, अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणांनी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा निर्माण होणे संभवते. संततीबाबत अन्य समस्यानाही तोंड द्यावे लागेल. नोकरीत वरिष्ठांशी वाद, मतभेद होणे संभवते. जपा. केवळ अनुकुल बाब म्हणजे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचा योग आहे अशापैकी काहीना अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळीना वारसा हक्काने धनलाभ होऊ शकेल. तसेच या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना प्रदेशगमनाची संधी मिळेल. मन:शांतीसाठी कुलदैवताची व श्रीहनुमानाची उपासना करा.

**(११) कुंभ** - सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय हळवे झाले असल्यास मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असतील असे वाटते. तसे असेल तर स्वभाव अत्यंत अस्थिर झाला असून सतत अविचाराने आचरण घडत असल्याची शक्यताही जाणवते. त्याचप्रमाणेआर्थिक चिंता असल्यास बोलणे अति फटकळ होत असण्याची शक्यताही जाणवते. म्हणून मनावर ताबा ठेवा, विचारपूर्वक आचरण करा. त्यामुळे मनस्ताप कमी होईल व विपरीत असे काही घडणार नाही. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल होईल. या राशीच्या अधिकारी मडळीना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळणेच सुखाचे होईल. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्ध ात्नो काय घडेल त्याला शांत मनाने सामोरे जा. उष्णता विकारांनी अनारोग्य होणे संभवते. काही मंडळीना पोटविकाराचा तर काहीना मूत्रविकाराच ाआजार त्रस्त करीलसे वाटते. जीवनसाथीशी वाद, भांडण करू नका. मौन व्रत धारण करा. तेच सुखाचे होईल. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे विवाहेच्छू चे विवाह ठरतील. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध निर्माण होतील. प्रवासाचे योग येणेही शक्य आहे. यांत्रिकत ांत्रिकनोकरीव्यवसाय, औषधविक्रेते , लोखंडी सामानाचे व्यापारी यांना काळ प्रगतिकारक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्र गतीस काळ

अनुकुल होईल. मात्र त्याना आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. महिन्याचा अखेरचा सप्ताह सुखसमाधान देईल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना व श्रीहनुमाना ची उपासना मना:शांती देऊ शकेल.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अतिशय अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा, असे वाटते. त्यामुळे कोणी काही समजावून सांगितले तरी ते सहन होत नसावे, अशीही शंका येते. सुखासीनतेकडे मनाचा ओढा असल्यामुळे असे घडत असावे. तसे असेल तर येथे स्पष्टच सांगितले पाहिजे की त्यांनी सतत सावधानतेने आचरण करावे. कारण अपघात भय आहे. काहींना चिंतेमुळे मानसिक व्यग्रता आली असाव्ी असेही वाटते. त्यामुळे गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. महिन्याचा पूर्वार्ध प्रतिकुल असल्याने असे होणे शक्य आहे. पण महिन्याचा उत्तरार्ध खूपच अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे धीर धरा आणि आपले दैनंदिन कर्त व्ये व्यवस्थित पाडा. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख लाभेल. नोकरी-व्यवसायात अनुकुल परिस्थिती राहील. शारीरिक- मानसिक आरोग्य सुधारेल. बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अपेक्षित प्रगती करणे शक्य होईल. गुप्त पोलीस खात्यातील मंडळीना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना काळ उपयुक्त व प्रगतिकारक होईल. पण विविध कारणांनी संततीबाबत्च्या समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. मित्रसुख लाभेल. ज्यांची शेतीवाडी असेल त्यांना ती खूप लाभदायक होईल. मात्र ज्यांना वाममार्ग धन सहज प्राप्त होणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. तसेच राहूमुळे वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा किंवा श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. बावन्न श्लोकी गुरुचरित्र दररोज नियमितपणे वाचा.

=====00000O00000=====